# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

१४वा मजला एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई 21

जावक क्र.मजीप्रा/सस/तांशा–2/ 3155                                                    दिनांक : 30/10/1999

// तांत्रिक परिपत्रक क्र 30 //

विषय :– पाणी पुरवठा व ड्रेनेज योजनेतील महत्वाच्या कामांच्या उपांगाच्या झालेल्या कामांची रेकॉर्ड ड्रॉईंग्ज तयार करणे बाबत.

पाणी पुरवठा योजना व ड्रेनेज योजना तयार झाल्यानंतर त्या योजनांच्या सर्व उपांगाची प्रत्यक्ष करण्यात आलेल्या कामांप्रमाणे रेकॉर्ड ड्रॉईंग्ज खात्यामार्फत तयार केली जाणे अपेक्षित आहे.

याबाबत खालील सूचना काटेकोर अंमलबजावणीसाठी पुन्हा निर्गमित करण्यात येत आहेत.

1 योजनेच्या सर्व कामांची त्यातील कामाचे वेळी केलेल्या आवश्यक त्या बदलानुसार नोंदी . घेऊन रेकॉर्ड ड्रॉईंग्ज तयार करण्यात यावीत.

2. रेकॉर्ड ड्रॉईंग्जचा उपयोग करुन प्रत्यक्ष जागेवर आवश्यक ते तपशील दाखविता येतील या पध्दतीने त्यावर सर्व नोंदी दिसणे आवश्यक आहे.

3) रेकॉर्ड ड्रॉईंग्ज निविदेप्रमाणे कंत्राटदारांनी (विशेष कामासाठी) करावयाची असल्यास ती त्यांचेकडून अंतिम देयक अदा करण्यापूर्वी करुन घ्यावीत व खात्याचे नोंदीस ठेवावीत (उदा. जलशुध्दीकरण केंद्र वगैरे ).

4) रेकॉर्ड ड्रॉईंगमध्ये सदर कामांची तांत्रिक माहिती व इतर आवश्यक माहिती तक्त्याच्या स्वरुपात न चुकता नोंद करावी.

5) अशा ड्रॉइंग्जचे रेकॉर्ड काळजीपूर्वक नीट यादी करुन चटकन व नेमके सापडेल अशा पध्दतीने जपून ठेवावे.

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रिक)

प्रत,
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नवी मुंबई
सर्व मुख्य अभियंता, म.जी. प्रा.
सर्व अधीक्षक अभियंता म.जी.प्रा.मंडळ
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम विभाग यांना माहितीसाठी व तात्काळ कार्यवाहीसाठी.